# चित्‌शक्ती विलास

## स्वामी मुक्तानंद

रामजा नावाचा एक धनगर होता. तो खूप धनवान होता. तो आपला इष्टदेव खंडोबा आणि त्याचे वाहन घोडा यांच्या सुवर्णमूर्तींची पूजा करीत असे. खंडोबाचे वाहन असलेल्या घोड्याची मूर्ती, त्याच्या मूर्तीपेक्षा मोठी होती. लक्ष्मी चंचल आहे, हे महापुरुषांचे कथन वस्तुतः बरोबर आहे. काहीही स्थिर राहणारे नसते. दिवस बदलत राहतात. रामजाची स्थिती पण अशीच बदलून गेली. श्रीमान होता, दरिद्री झाला.

तुम्ही हे असे समजून घ्या, की एकाच मातेची दोन लेकरे आहेत—संपन्नता आणि दरिद्रता. दोघी सख्ख्या बहिणी आहेत. याच प्रकारे सुख आणि दुःख, कीर्ती आणि कलंक भाऊ-भाऊ असल्यामुळे एकत्र राहतात. एकमेकांबरोबर मोठ्या प्रेमाने राहतात. एकमेकांपासून कधी दूर होत नाहीत. एकामेकांना कधी विसरतही नाहीत. इतकेच आहे, की आपले स्वागत कधी मोठा भाऊ करतो तर कधी लहान भाऊ. जेव्हा मोठा भाऊ स्वागत करतो, तेव्हा आपल्याला संपत्ती, ऐश्वर्य, सत्ता आणि राजत्व प्राप्त होते. जेव्हा छोटा भाऊ मोठ्या भावाला सांगतो, “दादा, तू जरा आराम कर, आता मी थोडी सेवा करतो.” तेव्हा कंगाली, फकिरी, आपत्ती, दुर्दशा आपल्याकडे येतात.

रामजाचे असेच झाले. मोठी बहीण विश्रांती घ्यायला गेली आणि धाकटी बहीण स्वागत करायला आली. रामजा कंगाल झाला. खाण्यापिण्याचीही भ्रांत पडू लागली. लोक म्हणाले, “अरे रामजा दादा, का असे दैन्य भोगतोस? हे बघ, तुझ्या देवघरात ज्या सोन्याच्या मूर्ती आहेत, त्या भगवंताकडे क्षमायाचना करून विकून टाक. पुन्हा मेंढ्या खरेदी कर आणि आपला धंदा चालू कर. पुन्हा पैसा कमाव. मग नवीन मूर्ती बनवून घे, त्यांची प्राणप्रतिष्ठा कर, पूजा कर, ब्राह्मण, साधु-संत, गरीब, आंधळे, लंगडे सर्वांना खायला घाल. तुझा धंदा चालायला लागला, की सत्कर्मेही होतील.”

दरिद्रतेच्या अवस्थेत विचारही कनिष्ठ होऊन जातात. मनुष्य केवळ सोन्याने किंवा धनानेच दरिद्री होत नाही, तर विचारानेही दरिद्री होऊन जातो. रामजाने लोकांचे म्हणणे मानले. घोड्यासहित खंडोबाला झोळीत घेऊन तो सराफ-बाजारात गेला. एका सराफाच्या दुकानात जाऊन बसला. सराफाने विचारले, “काय रामजा दादा, काय झाले?”

रामजा दादाने झोळीतून भगवान खंडोबा आणि त्याचे वाहन असलेल्या घोड्याला बाहेर काढले आणि म्हणाला, “शेटजी, हे मला विकायचे आहे. थोडी पैशाची गरज आहे, म्हणून विकणे भाग पडले. यांची

किंमत सांगा." सराफाने वजन केले. भगवान खंडोबाची मूर्ती होती एक शेराची आणि वाहन घोडा होता तीन शेरांचा. त्या काळी हजार रुपयांना एक शेर सोने मिळत असे. सराफ म्हणाला, "रामजा दादा, तुमच्या देवाचे एक हजार रुपये मिळतील आणि घोड्याचे तीन हजार."

हे ऐकताच रामजा चिडला. तो म्हणू लागला, "काय हो शेटजी, तुम्हाला काही अक्कल आहे की नाही? माझ्या देवाची किंमत एक हजार रुपये आणि घोड्याची तीन हजार! तुम्हाला काही समज आहे की नाही?" बोलताबोलता रामजा क्रोधाने लालबुंद झाला.

वस्तुतः अकलेची उणीव रामजातच होती. शेटजी म्हणाले, "अरे रामजा! तुला अक्कल फार कमी आहे. भगवान आणि घोडा हे तुझ्या दृष्टीने आहे; माझ्यासाठी तर दोन्हीही सोने आहे आणि वजनानुसार किंमत आहे. तुझा देव एक शेर सोन्याचा आहे, म्हणून त्याचे मूल्य एक हजार आणि घोडा तीन शेर सोन्याचा आहे, म्हणून त्याची किंमत तीन हजार. विकायचे असेल तर विक, नाहीतर आपला रस्ता धर."

परम सिद्ध श्री एकनाथ महाराज असेच समदर्शी होते. ते केवळ सोने पाहणारे होते. त्यांच्यासाठी जगात सर्वत्र केवळ परमात्माच होता. त्यांच्यापाशी उच्च-नीच असा भाव, जाती-व्यक्तीचा भेद किंवा लहान-थोर याचे ज्ञान नव्हते. *हरिरेव जगत्,* 'प्रत्यक्ष परमेश्वरच हे विश्व आहे', अशी त्यांची दृष्टी होती आणि ते पूर्ण समता भावाने राहत असत.

एके दिवशी त्यांच्याकडे एक महार [हरिजन] जातीची मुलगी आली आणि मोठ्या प्रेमाने, भक्तिभावाने म्हणाली, "ओ बाबा, तुमच्याकडे देव पाणीदेखील भरतो. मी ना त्या भगवंताला पाहू शकत, ना त्याला बोलावू शकत. हे एकनाथ बाबा! तुम्हीच माझे देव आहात. माझी कोरडीसुकी भाकरी खायला माझ्या झोपडीत या. मी तुमच्या कथा ऐकल्या आहेत. कथेत तुम्ही सांगितले आहे की, महापुरुष देवासमान असतात. तर बाबा! माझ्याकडे आज जेवण करावे. मी तुम्हाला बोलवायला आले आहे."

तिने अशा रीतीने दीनभावाने प्रार्थना केली. एकनाथ महाराजांनी तिचे म्हणणे मान्य केले. ते त्या हरिजन मुलीच्या घरी जेवायला गेले. त्यांनी, तिने बनविलेली कोरडीसुकी भाकरी खाल्ली. तिथल्या सर्व लोकांनी हे पाहिले. मग काय विचारता! मोठी चर्चा सुरू झाली.

लोक म्हणू लागले, "पाहा ना, त्या एकनाथाने, हरिभक्त ब्राह्मण असूनसुद्धा एका महाराच्या घरी जेवण केले! छिः! छिः! तो तर भ्रष्ट झाला. या कर्मभ्रष्टाकडे कोणत्याही ब्राह्मणाने जाऊ नये." अशा प्रकारे साऱ्या ब्राह्मणांनी एकनाथ महाराजांना बहिष्कृत केले.

एकनाथ महाराजांना यामुळे काहीही फरक पडला नाही. ते तर दररोजच्या प्रमाणे आनंदी होते. त्यांचा नियम होता—‘संपदा आपदा माने जो सम सदा.’ ते समस्थितीत राहिले, शांत भावाने राहिले. गावातले वातावरण त्यांच्या विरुद्ध होत चालले. काही ना काही बोलून सर्व लोक त्यांचा अपमान करू लागले, त्यांना धिक्कारू लागले. एकनाथ महाराजांना त्याचे काहीच दुःख वाटले नाही. गृहस्थाश्रमात राहूनही त्या सिद्ध महापुरुषाची दृष्टी सम होती.

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

स्वामी मुक्तानंद, *चित्शक्ती विलास* [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३] पृष्ठ १७१-१७३.